Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://epaper.marathwadapatra.com • https://marathwadapatra.com




दैनिक

| बीड | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | परभणी | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे
Mo. 9822152955




Beed | DAILY | MARATHI | Year-03 | Issue -302 | SATURDAY DT.03 FEBRUARY 2024 | RNI-MAHMAR/2021/80074 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

बीड | दैनिक | मराठी | वर्ष -०३ | अंक -३०२ | शनिवार,दि.०३ फेब्रुवारी २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२१/८००७४ | । किंमत ३ रू | । पाने ४

# चोरीचा मामला आणि जोरजोरात बोंबला

## उद्धव ठाकरेंचा भाजपवर घणाघात

मुंबई : आम्ही आमचं हिंदुत्व काय आहे हे स्पष्ट केलं. चोरीचा मामला आणि जोरजोरात बोंबला. भारतीय जनता पक्ष...बाळासाहेब नेहमी त्यांना कमळाबाई म्हणायचे. मी यासाठी कमळाबाई बोलतोय, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

'आम्ही आमचं हिंदुत्व काय आहे हे स्पष्ट केलं. चोरीचा मामला आणि जोरजोरात बोंबला. भारतीय जनता पक्ष...बाळासाहेब नेहमी त्यांना कमळाबाई म्हणायचे. मी यासाठी कमळाबाई बोलतोय, कारण बाळासाहेबांनी सांगितलं. आम्ही बाळासाहेबांचे विचार सोडणार नाही, असं म्हणत उद्धव ठाकरेंनी भाजपवर घणाघात केला आहे. ते रायगडमध्ये बोलत होते.

ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे हे रायगड दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यातील माणगावमधील जाहीर सभेत उद्धव ठाकरेंनी भाजपवर जोरदार टीका केली आहे. 'माझ्या लोकांवर ईडी, सीबीआय लावता. एवढी हिंमत आहे तर चीनवर सोडा ना.. तो घुसलाय तिकडे. मी पंतप्रधान मोदींना शत्रू मानत नाही, पण ते मला मानतात. त्यात माझी काय चूक? असा सवाल उद्धव ठाकरेंनी उपस्थित केला.



'२०१४ साली असं काय झालं की तुम्ही युती तोडली. लगेच सांगतात आम्ही हिंदुत्व सोडलं. हिंदुत्व काय बाळासाहेबांचे धोतर आहे काय? आमच्याकडे काळी टोपी नाही, आमच्याकडे काळ्या मनाची माणसं नाहीत. आमच्याकडे भगव्या मनाची भगव्या टोपीची माणसं आहेत, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

'छत्रपती शिवाजी महाराजांनी कुराणचं कसं संरक्षण हे इतिहासात आहे. एक कोण तरी चमचा बोलला बिलकीस बानोची म्हणून घेतली. नवाज शरीफच्या वाढदिवसाचा केक पाकिस्तानात कापला नाही. ज्याने भारताची फाळणी केली, त्या जिनाच्या थडग्यावर आम्ही डोकं ठेवलं नाही, असं म्हणत उद्धव ठाकरेंनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीका केली.

'आमचं हिंदुत्व हे आला अंगावर तर घेतलं शिंगावर.



कुरुलकर ज्याने भारताची माहिती दिली, त्याबाबत भाजपने त्यांची भूमिका स्पष्ट करावी. आम्ही आमचं हिंदुत्व काय आहे हे स्पष्ट केलं, असंही ठाकरे म्हणाले.

---

### सोयाबीनला मिळेना भाव

# हमीभावही मिळत नसल्याने शेतकरी चिंतेत

प्रतिनिधी । बीड

बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात सोयाबीन पिकाची लागवड होते. मात्र, या वर्षी पडलेल्या बाजारभावामुळे शेतकरी हवाल दिल झाला आहे. विशेष म्हणजे सोयाबीनला यंदा सरकारने चार हजार ६०० रुपये हमीभाव जाहीर केला आहे. मात्र, इतकाही दर शेतकऱ्यांना मिळत नसल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडला आहे.

बीड बाजार समितीत बुधवारी



सोयाबीनची सुमारे ११५ क्विंटल आवक झाली. मात्र, बीड बाजार समितीत शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा कमी भावाने

(उर्वरीत पान २ वर)

---

### शिंदे सरकारचा मोठा निर्णय

# आता मनोज जरांगेंना मिळणार सरकारी सुरक्षा

प्रतिनिधी । बीड

मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षणासाठी आक्रमक भूमिका घेतली आहे. गेल्या काही महिन्यांपासून जरांगे यांनी मराठा आरक्षणाचा मुद्दा चांगलचा लावून धरला आहे. काही आठवड्यांपूर्वी जरांगे यांनी मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी पदयात्रा काढली होती. त्यावेळी शिंदे सरकारने सर्व मागण्याही



मान्य केल्या होत्या. त्यानंतर आता शिंदे सरकारने मनोज जरांगे यांना सुरक्षा पुरवण्याचा मोठा निर्णय घेतला आहे.

मराठा आरक्षणाच्या मागणसाठी जालन्यातील अंतरवाली सराटी गावात आमरण उपोषण करणारे मनोज जरांगे यांच्या सुरक्षेसाठी पोलिसांकडून दोन कॉन्स्टेबलची सुरक्षा पुरवली जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलन करणाऱ्या जरांगे यांना आता जिल्ह्यातील पोलिसांकडून सुरक्षा पुरवली जात होती.

(उर्वरीत पान २ वर)

---

### सासरच्या नातेवाईकांनी छळ केल्याच्या आरोपीतुन

# चार आरोपींची निर्दोष मुक्तता

प्रतिनिधी । बीड

बीड येथील फिर्यादी तेजस्वीनी संतोष आंबे हिने पतीने दुसरे लग्न केल्याच्या संशयावरुन पती, सासु, सासरे व प्रेमीका यांचे विरुध्द मानसिक व शारीरिक छळ केल्याच्या आरोपातुन मा. चौथे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब, बीड चव्हाण मॅडम यांनी चार आरोपींची निर्दोष मुक्तता केली, या प्रकरणात आरोपी तर्फे ॲड.ओ.डी. गायकवाड यांनी भक्कमपणे बाजु मांडली.

सदर प्रकरणात फिर्यादी हिस पती संतोष आंबे याचे बाहेर प्रेमसंबंध चालु आहेत, असे समजले, यावरुन पती-पत्नीत भांडण झाले व त्यात सासु सारे यांनी पतीलाच प्रोत्साहन दिले. दिनांक १०.०५.२०२२ रोजी फिर्यादीच्या मोबाईलवर पतीने दुसरे लग्न केलेला फोटो आला, त्यावेळी पती, सासु, सासरे यांना विचारणा केली असता त्यांनी फिर्यादीस शिवीगाळ करुन लाथाबुक्क्याने मारहान करुन घराबाहेर हाकलुन

(उर्वरीत पान २ वर)

---

# बीड जिल्हा रुग्णालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा

### समुपदेशक गुणांकनात बीड पीसीपीएनडीटी प्रथम

प्रतिनिधी । बीड

राज्यस्तराव गर्भधारणापूर्व व निदानतंत्र लिंग निवडीस प्रतिबंध कायदा (पीसीपीएनडीटी) मध्य समुपदेशन गुणांकात बीड प्रथम असून समुपदेशक ड निलेश जोशी यांची महाराष्ट्रातून गुणांकनात प्रथम क्रमांकाने निवड झाली आहे.(पीसीपीएनडीटी) कामकाजाचे नियमितपणे राज्य शासनाकडे माहिती विहित कालावधीत पाठवण्यात येते, याबाबत बीड जिल्हयाने वेळोवेळी राज्य शासनाच्या आदेशाचे व शासनास विहित

(उर्वरीत पान २ वर)

---

# बीड औद्योगिक विकासाला ७५ कोटींचे आर्थिक सहाय्य : उद्योग मंत्री उदय सामंत

प्रतिनिधी । बीड

बीड जिल्हयातील विविध औद्योगिक वसाहतीच्या पायाभूत सुविधांच्या विकासासाठी राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी यांनी ७५ कोटींचे आर्थिक सहाय्य करण्याची घोषणा आज येथे केली.जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात पत्रकार परिषद घेण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. या पत्रकार परिषदेत राज्याचे कृषी मंत्री तथा जिल्हयाचे पालक मंत्री धनंजय मुंडे उपस्थित होते. आमदार प्रकाश सोळंके उपस्थित होते.

पत्रकार परीषद होण्यापुर्वी उद्योग मंत्री श्री सामंत आणि श्री मुंडे तसेच आमदार प्रकाश सोंळके, जिल्हाधिकारी दिपा मुधोळ - मुंडे, मुख्यकार्यकारी अधिकारी अविनाश पाठक यांच्या उपस्थितीत यांनी



बीड जिल्हयात असणाऱ्या आष्टी, केज, धारूर, सिरसाळा, माजलगाव, परळी आणि बीड येथ असणाऱ्या औद्योगिक वसाहतींचा आढावा घेतला. यावेळी स्थानिक उद्योजक उपस्थित होते. उद्योग मंत्री यांनी मुख्यमंत्री रोजगार र्निमीती, विश्वकर्मा योजना आणि खादी ग्रामोउदयोग योजनांचा आढावा घेतला.

जिल्हयातील नागरीकांना या योजनेचा अधिकाधिक लाभ मिळावा यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी प्रयत्न करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले असल्याची माहिती त्यांनी पत्रकार परिषदेत दिली.

आज झालेल्या बैठकीत उद्योग विभागातर्फे नवसंजीवनी योजना राबविली जाते. ज्यातंर्गत रखडलेल्या प्रकल्पाला गती देण्याचे काम होत असते. याचा लाभ उद्योजकांनी उचलावा असेही श्री सामंत यांनी पत्रकारांना माहिती देतांना सांगितलेविट भट्टी क्लस्टर (उद्योग समुह) ला तसेच रेशीम क्लस्टर तत्वत: मान्यता

आज झालेल्या बैठकीत विट भट्टी क्लस्टर आणि रेशी क्लस्टर ला तत्वत: मान्यता दिली असल्याची माहिती उद्योग मंत्री श्री सामंत यांनी सांगितले. बीड

(उर्वरीत पान २ वर)

---

# जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे ५ फेब्रुवारी रोजी आयोजन

प्रतिनिधी । बीड

जिल्हास्तरीय लोकशाही दिन सोमवार दिनांक ५ फेब्रुवारी, २०२४ रोजी सकाळी १०-०० ते दुपारी १२-०० या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजन करण्यात आले आहे. लोकशाही दिनात अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज १५ दिवस अगोदर दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. लोकशाही दिनासाठी अर्ज देताना संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा व तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झालेली नसावी अशाच अर्जदारांनी टोकन क्रमांकाच्या पावतीसह अर्ज दोन प्रतीत सादर करावा.

लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व, अपील, सेवाविषयक, आस्थापनाविषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. तसेच तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाची तहसिलदार यांच्या स्वाक्षरीची पोहोच पावती व त्यासाठी दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापूर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल. ज्यांनी यापूर्वी जिल्हास्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेला आहे परंतु अद्याप कार्यवाही झालेली नाही, अशा तक्रारदारांनी पुन्हा अर्ज करु नयेत.

---

# बीडमधील नाट्य दिंडीत कलाकारांची मांदियाळी

बीड ।प्रतिनिधी

अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाची बीड शहरात शोभा यात्रा पार पडली आहे. शुक्रवारी (दि.२) सकाळी नाट्य दिंडी काढण्यात आली होती. यंदा नाट्य संमेलनाचं १०० वे वर्ष असल्यानं भव्य दिंडी काढण्यात आली होती.ढोल, ताशा, गुलाबी फेटे, रांगोळयांच्या पायघड्यांच्या उपस्थित बीड शहरात १०० व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचं बिगूल वाजलं. मोठ्या थाटात नाट्य दिंडी काढण्यात आली. नाट्य कलावंतांसोबत वासुदेव, पिंगळा, पोतराज, गोंधळी, दशावतार या लोक कलाकारांच्या



### बीडकरांनी अनुभवला नयनरम्य सोहळा

बीड शहरात शुक्रवारची सकाळ ढोल, ताशा, लेझिम पथकाच्या जयघोषात झाली. सकाळच्या वेळी राम सीता, लक्ष्मण,हनुमान रथ, वासुदेव, वारकरी संप्रदाय टाळ, वासुदेव देखावा, गोंधळी यांच्या सादरीकरणानं नागरिक भारावून गेले होते. ठिकठिकाणी थांबून नागरिकांनी या नाट्य दिंडीचा नयनरम्य सोहळा अनुभवला.

लोककलेनं ही नाट्य दिंडी सजली होती. ही दिंडी पाहण्यासाठी बीडकरांनी गर्दी केली. यावेळी नागरिकांना कलाकारांसोबत सेल्फी काढण्याचा मोह आवरता आला नाही. या दिंडीत कलावंतांनी उत्साहवर्धक वातावरणात दिंडीत सहभाग घेतला. यावेळी सर्व सहभागी झालेल्या कलावंतांनी

(उर्वरीत पान २ वर)

---

# शिवसैनिकांनो, एकजूट होऊन एकनाथ शिंदे साहेबांचे हात बळकट करा- उदय सामंत

बीड /प्रतिनिधी

सर्वसामान्यांचे लाडके मुख्यमंत्री तुमचे-आमचे आणि आपल्या सर्वांचे नेते सन्मानीय एकनाथजी शिंदे यांचे हात बळकट करण्यासाठी एकजूट व्हा आणि शिवसेनेचा भगवा गाव, वस्ती, वाडी आणि तांड्यावरील घराघरात आणि प्रत्येकाच्या मनामनात उभा करा असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे उद्योगमंत्री तथा शिवसेना उपनेते ना. उदयजी सामंत साहेब यांनी शिवसेनेच्या आढावा बैठकीत केले.

काल दि. ०२/०२/२०२४ रोजी बीड शहरातील हॅाटेल ग्रॅंड यशोदा, बार्शी रोड येथे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते मा.ना. एकनाथजी शिंदे साहेब यांच्या आदेशानुसार महाराष्ट्र राज्याचे उद्योगमंत्री तथा शिवसेना उपनेते ना. उदयजी सामंत

### उदय सामंत, अर्जुन खोतकर यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेनेची आढावा बैठक संपन्न!



साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये शिवसेनेची आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीसाठी बीड जिल्हा शिवसेना, युवासेना, महिला आघाडी तसेच अंगीकृत संघटनांचे पदाधिकारी, आजी-माजी लोकप्रतिनिधी यांची भरगच्च संख्येत उपस्थिती होती.

या आढावा बैठकीत लोकसभा संपर्कप्रमुख विजय पाटील, महिला आघाडी जिल्हा संपर्कप्रमुख सविता ताई किवंडे माजी राज्यमंत्री सुरेशजी नवले , जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक, कुंडलीक खांडे यांनी उपस्थित

(उर्वरीत पान २ वर)

संपादकीय

## 'ईडी'च्या छायेतले सत्तानाट्य

झारखंडचे मुख्यमंत्री आणि झारखंड मुक्ती मोर्चाचे अध्यक्ष हेमंत सोरेन हे या घडामोडींनिमित्त चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहेत. आता सोरेन यांना अटक झाल्याने या नाट्याचा एक अंक पूर्ण झाला आहे.

केंद्रीय तपास संस्थेचा पाठलाग सातत्याने सुरू असताना एखाद्या राज्याचे मुख्यमंत्री संपर्क क्षेत्राच्या बाहेर जाऊ शकतात काय? झारखंडमधील अलीकडील घटनाक्रमाने चौकशी संस्थेची प्रतिष्ठा आणि राजकीय नेत्यांची विश्वासार्हता, अशा दोन्ही बाबींवर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. झारखंडचे मुख्यमंत्री आणि झारखंड मुक्ती मोर्चाचे अध्यक्ष हेमंत सोरेन हे या घडामोडींनिमित्त चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहेत. आता सोरेन यांना अटक झाल्याने या नाट्याचा एक अंक पूर्ण झाला आहे.

झारखंडमधील घोटाळ्याचा संबंध भारतीय लष्कराच्या जमिनीशी आहे. काही वर्षांपूर्वी एकाच दिवशी झालेल्या अवाढव्य जमीन खरेदीने अनेकांना विस्मयचकित केले होते. खोट्या नाव-पत्त्यांच्या आधारावर झालेल्या या व्यवहाराबद्दलची पहिली तक्रार रांची नगरपालिकेने केली होती. आदिवासींच्या जमिनीवर बेकायदेशीरपणे कब्जा झाला, असाही आरोप या प्रकरणात आहे. ईडी अर्थात सक्तवसुली संचालनालयाची कारवाई त्यानंतर सुरू झाली. वारंवार पाठविलेल्या समन्सकडे मुख्यमंत्री सोरेन यांनी केलेले दुर्लक्ष संशय वाढविणारे होतेच, पण कारवाईच्या वेळांनीही लोकमनांमध्ये तेवढाच संदेह निर्माण केला आहे. सध्या आयएसआय अधिकारी आणि दोन व्यापाऱ्यांसह चौदा व्यक्ती या प्रकरणात अटकेत आहेत. बेकायदेशीर उत्खननाच्या शंभर कोटी रुपयांच्या उत्पन्नाची चौकशी मागील दोन वर्षांपासून सुरू आहे. देशातील अनेक राज्यांत 'ईडी'चा धाक रुळला असल्याने झारखंडमधील अध्यायाची काय परिणती होते, ही उत्कंठा ताणली गेली होती. यानिमित्ताने झारखंडमध्ये राजकीय भूकंप झाला आणि चंपेई सोरेन यांची मुख्यमंत्रीपदी वर्णी लागल्याने तेथील राजकारणाला नवे वळण मिळाले आहे.

काही काळासाठी 'संपर्कहीन' झालेले हेमंत सोरेन चौकशीला सामोरे गेले. बिहारमधील चारा घोटाळ्यात लालूप्रसाद यादव यांच्या अटकेनंतर त्यांच्या पत्नी राबडीदेवी यांचा उदय झाला होता. झारखंडच्या जमीन घोटाळ्यातही कल्पना सोरेन यांच्या रूपात तोच कित्ता गिरविला जाण्याची शक्यता होती, मात्र चंपेई सोरेन यांची सरशी झाली. एकूण ८१ सदस्यांच्या विधानसभेत झामुमो नेतृत्वातील सत्ताधारी पक्षांकडे ४८ आमदार आहेत. विरोधकांची संख्या ३२पर्यंत पोचते. चंपई सोरेन 'झारखंडचे टायगर' म्हणून ओळखले जातात. त्यांची शिबू सोरेन यांच्याशी जवळीक आहे. ते सध्या वाहतूक मंत्रालय सांभाळतात. कल्पना किंवा चंपई यांच्या समर्थनार्थ आमदारांनी दोन कोऱ्या पत्रांवर स्वाक्षऱ्या केल्या होत्या. या पक्षात सारे काही आलबेल नाही. मुख्यमंत्री हेमंत यांना भाऊ वसंत आणि वहिनी सीता सोरेन यांच्याकडून शह मिळण्याचाही शक्यता होती. सीता यांच्या गटात अठरा आमदार आहेत. एकीकडे ईडीने सरकारच्या गाडीची चाके थांबविली असताना मंगळवारी विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत सात आमदार गैरहजर असल्याने मुख्यमंत्री सोरेन यांची धडधड अधिकच वाढली. अखेर राजकीय पेचातून त्यांनी मार्ग काढलेला दिसतो. अर्थात, झामुमोने केंद्राच्या कारवाईचा ताकदीने विरोध केला आहे. 'हेमंत सोरेन हे हिमंत बिस्वशर्मा किंवा नितीश कुमार नाहीत. ते बहादूर शिबू सोरेन यांचे पुत्र आहेत', अशी बेधडक प्रतिक्रिया देत पक्षाचे नेते सुप्रियो भट्टाचार्य यांनी झामुमोची लढाऊ वृत्ती शाबूत असल्याचे संकेत दिले. तर, केंद्रीय यंत्रणांच्या आकस्मिक छापेमारीमुळे मला तसेच माझ्या कुटुंबाला तीव्र मानसिक आणि भावनात्मक त्रास झाला, असा दावा करीत हेमंत सोरेन यांनी ईडी अधिकाऱ्यांविरुद्ध तक्रार दाखल केली आहे.

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री एस.पी.वानखडे यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.३१/२०२३**
गणेश पि.दिनानाथ शिंदे व इतर विरूध्द निरंक
**(मार्फत-ॲड.आर.यु.पंडित, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे **दिनानाथ साहेबराव शिंदे हे दि.१२.१०.२०२३ रोजी सिरसदेवी ता.गेवराई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१.गणेश पि.दिनानाथ शिंदे वय-४० वर्षे, रा.सिरसदेवी ता.गेवराई जि.बीड, २.राहुल पि.दिनानाथ शिंदे वय-३४ वर्षे, रा.सदर, ३.सोनाली भ्र.आनंद पुंड वय-३५ वर्षे, रा.पिंपळगांव निमजी ता.जि.बीड** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **दिनानाथ साहेबराव शिंदे** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.१०/०१/२०२४** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख -२१/०२/२०२४**

स्वाक्षरित/- **कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई | शिक्का | आदेशावरून स्वाक्षरित/- **सहाय्यक अधिक्षक** दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

# डॉ.दिपाताई, डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांनी नाट्यकलेला चालना दिली-ना.धनंजय मुंडे

### डॉ.योगेशभैय्यांनी नाट्य संमेलनातून विकासाचा मुद्दा मांडला, त्यांचे भविष्य उज्ज्वल -ना.उदय सामंत

**बीडमध्ये विभागीय नाट्य संमेलनाचे शानदार उद्घाटन; दिग्गज सिनेकलाकारांची हजेरी**

बीड ।प्रतिनिधी

सुहासिनी इर्लेकर या प्रसिद्ध कलावंत होत्या. आमच्या परळीत खरी नाटक होतात. पण डॉ.दीपा काकू यांनी परळीत नाट्य परिषदेची शाखा सुरू केली. आपल्या आईचा वारसा त्यांनी पुढे चालवला. फक्त राजकीय नव्हे तर सांस्कृतिक वारसा देखील पुढे नेला. डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांनी बीडमध्ये नाट्यगृह उभारून नाट्य कलेला खर्या अर्थाने चालना दिली. त्यामुळे त्यांचं नाव घेतल्याशिवाय हे नाट्य संमेलन पूर्ण होऊ शकत नाही, असे गौरवोद्गार कृषिमंत्री तथा पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी काढले. तसेच, डॉ.योगेश क्षीरसागर यांनी आजही विकासाचा मुद्दा सोडला नाही, याचे कौतुक करावे लागेल. त्यांचे भविष्य उज्ज्वल आहे. मी, धनंजय मुंडे हे देखील एखादा मंत्री आला की संधीचं सोनं करायचो, त्यांच्याकडून कामे मंजूर करून घ्यायची. डॉ.योगेशभैय्यांना बीड एमआयडीसी ते नाळवंडी या रस्त्यासाठी निवडणूक आचासंहिता लागण्यापूर्वी ६ कोटी रुपयांचा निधी देणार आहे. तसेच, नाट्यगृहासाठी २५ कोटी रुपयांचा निधी देण्यासाठी पालकमंत्र्यांचीही शिफारस असून मागणी पूर्ण करू, असा शब्द उद्योग मंत्री ना.उदय सामंत यांनी दिला.



बीड शहरातील पारस मैदानावरील (स्व.केशरबाई क्षीरसागर नाट्यनगरी) स्व.डॉ.सुहासिनी इर्लेकर रंगमंचावर अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या विभागीय नाट्य संमेलनाचे शानदार उद्घाटन शुक्रवारी (दि.२) झाले. नटराज पूजन, दिपप्रज्वलन आणि नाट्यघंटेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. नाट्य संमेलनाच्या अध्यक्षस्थानी उद्योगमंत्री ना.उदय सामंत हे होते. उद्घाटक म्हणून कृषिमंत्री तथा पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांची उपस्थिती होती. मंचावर विश्वस्त तथा नाट्य परिषदेचे माजी अध्यक्ष मोहन जोशी, नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले, आ.प्रकाश सोळंके, नाट्य परिषदेचे कार्यवाह अजित भुरे, उपाध्यक्ष भाऊसाहेब भोईल, सुप्रसिद्ध अभिनेते सचित पाटील, उपाध्यक्ष नरेश गडेकर, सुप्रसिद्ध अभिनेत्री गौरी कुलकर्णी, कोषाध्यक्ष सतीश लोटके, ज्येष्ठ अभिनेत्री सविता मालपेकर, सहकार्यवाह दिलीप कोरके, सुशांत शेलार, सिनेकलाकार विजय गोखले, संदीप पाठक, सचिन पाटील, पंढरीनाथ कांबळे, गौरी कुलकर्णी, चंद्रकांत कुलकर्णी, सुधीर निकम, बीड शाखाध्यक्ष डॉ.दीपाताई क्षीरसागर, स्वागताध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, शिवसेना जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे, डॉ.सारिकाताई क्षीरसागर, राजकिशोर मोदी, बाजीराव धर्माधिकारी, पुजाताई क्षीरसागर, नाट्य परिषद नियामक मंडळाचे सदस्य डॉ.संजय पाटील देवळाणकर, जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे, एसपी नंदकुमार ठाकूर, सीईओ अविनाश पाठक, सीओ निता अंधारे आदींची उपस्थिती होती.

पुढे बोलताना ना.धनंजय मुंडे म्हणाले, जीवनात अनेक कार्यक्रम केली, असंख्य नाटकं पहिली, आयुष्यात आलेली अनेक नाटकं भोगली, पण पहिल्यांदा मला विभागीय नाट्य संमेलनाचे उद्घाटन करण्याची संधी मला मिळाली. बीड जिल्ह्याने नाट्य क्षेत्राला अनेक नामवंत हिरे दिले आहेत. केशवराव देशपांडे यांचे नाव घेतल्याशिवाय या नाट्य संमेलनाचे कार्य पूर्णच होऊ शकत नाही.

२५ वर्षांपासून मी प्रशांत दामले यांना पाहतोय पण त्यांच्या चेहर्यावर तसू भर देखील फरक पडलेला नाही. ज्यांच्या नावात 'शांत' आहे, तरी प्रयोग करताना जे कधीच 'दमले' नाहीत असे दामले. तुम्ही पडद्यावर नाटक करता, आम्ही पडद्यामागे करतो. आपले जीवन हेच रंगमंच आहे. जीवन जगत असताना जे जे काही घडत असत ते प्रत्येक पात्र असत, उदयजींना देखील वेगवेगळे पात्र करावे लागते. उदय जिथे जातील तिथे तिथे नुसता उदो उदो होतो. १०१ वे राज्याचे नाट्य संमेलन आमच्या परळीत करण्याची आमची तयारी आहे. सगळे कोकणात नेऊ नका, उदयजी आम्हाला ही संधी द्या. आम्ही कुठेही कमी पडणार नाही, अशी ग्वाही धनंजय मुंडे यांनी दिली. ते म्हणाले, आम्ही गोपीनाथ मुंडे साहेबांचा राजकीय संघर्षाचा वारसा चालवतोय. नाट्यकलेला आम्ही सरकारकडून राजाश्रय द्यायला कुठेही कमी पडलो नाही, पडणार नाही. बीडच्या नाट्यगृहाला उदय सामंत यांनी २५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून द्यावा, या डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या मागणीचा ना.धनंजय मुंडे यांनी देखील पुनरुच्चार केला. पुढे त्यांनी, आपल्या मातीत कला आहे, पण आपल्या पाठीवर थाप द्यायला तो इथे येत नाही, ही आमची शोकांतिका असल्याचे सांगितले. घराघरात मोबाईलच्या माध्यमातून कलाकार तयार झाले आहेत. पण मग आम्ही काय करायचं? येत्या ५ वर्षात मोबाईल व्यसनमुक्त केंद्र सुरू करावे लागतील, अशी काळजी देखील मुंडे यांनी बोलवून दाखवली. अध्यक्षीय भाषण ना.उदय सामत यांनी केले. विभागीय नाट्यसंमेलनात नाट्य परिषदेचे मुंबई अध्यक्ष प्रशांत दामले यांनी मनोगत व्यक्त केले. नाट्य संमेलनाचे अध्यक्ष जब्बार पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली व नाट्य संमेलनाच्या कार्याध्यक्ष डॉ.दिपाताई क्षीरसागर, डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नियोजनातून विभागीय नाट्य संमेलन पार पडले. त्यांच्या नियोजनाबद्दल मान्यवरांनी तोंडभरून कौतूक केले. प्रास्ताविक डॉ.दीपाताई क्षीरसागर यांनी केले. सुत्रसंचलन शिप्रा मानकर, शोभा कुलकर्णी यांनी केले. आभार नियामक मंडळाचे सदस्य डॉ.संजय पाटील देवळाणकर यांनी मानले.

अध्यक्षीय भाषण करताना उद्योगमंत्री ना.उदय सावंत म्हणाले, स्वागताध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी नाट्य संमेलनाचे छान नियोजन केले. आता त्यांची जबाबदारी वाढली असून डॉ.योगेशभैय्यांनी डॉ.दिपाताई यांचा नाट्यकलेचा वारसा पुढे न्यावा, असे आवाहन केले. पुढे बोलताना ते म्हणाले, तुम्ही कलाकार तीन तास मेकअप करतात, पण आम्ही उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत मेकअप करतो. आम्हाला असे कलाकार आणि दिग्दर्शक तयार करायचे आहेत. पवित्र लोक या रंगमंचावर कामे करतात. रंगभूमी ही बालरंग भूमी पासून विकसित व्हायला पाहिजे होती. बाल रंग भूमीवर चांगल्या स्टोरी आल्या पाहिजेत. बालरंग भूमीला तुम्ही ताकद दिली पाहिजे. नाट्यगृहावर सोलार लावले पाहिजेत. मी माझ्या जिल्ह्यातील नाट्यगृहावर सोलार लावली. माझ्या नाट्यगृहाचे भाडे देखील २७ हजारवरून २० हजारांवर आणले पण हे भाडे मी १५ हजारांवर आणायला तयार आहे. ग्रामीण भागातून येणार्या कलाकारांची राहण्याची व्यवस्था केली पाहिजे. मुंबईजवळ दोन एकर जागा देऊ. वृध्द कलाकारांना चांगली वास्तू निर्माण करू. नाट्य परिषदेने विचार करावा. मी मैत्री जपणारा कार्यकर्ता आहे आणि मी हे धनंजय मुंडे यांच्याकडून हे शिकलो. राजकारणापलिकडे जाऊन एखाद्याला ताकद कशी दिली पाहिजे हे मी धनंजय मुंडे यांच्याकडून शिकलो. नाट्यगृहासाठी पैसे मिळवून देण्याची मी पुरेपूर प्रयत्न करेल. योगेश यांची भावना पूर्णपणे प्रामाणिक आहे, त्याला पालकमंत्री यांनी देखील अनुमोदन दिले आहे, त्यामुळे लवकरच मी निधी उपलब्ध करून देईल, असा शब्द मी देतो. मी कधीच कोण्या पक्षाचा कोण कलाकार आहे हे पाहून काम करत नाही किंवा त्यांचा तसा वापर पण करून घेत नाही. अशा कार्यक्रमातून किमान १०० जण कलाकार तयार केले पाहिजेत. मतभेद जरी असले तरी हे नाट्य कलाकार सगळे विसरून काम करण्यासाठी पुढे येतात. त्यांचा आदर्श राजकारणी लोकांनी घेतला पाहिजे. बारामती ते मंत्रालय या नाटकात धनंजय मुंडे यांचा सहभाग होता. तर मुंबई, गुवाहाटी व्हाया सुरत या नाटकात मी होतो. मी पुन्हा येईल हे नाटक देखील आधी रचले होते, असा टोला त्यांनी लगावला. आपल्यासारख्या कलाकारांकडून कोणीही दुखावले जाणार नाही. याची आपण राजकारणातील कलाकारांनी काळजी घ्यावी. ज्या मतदारसंघातून मी निवडून येतो, तिथले कलाकार मला रंगमंचावर मरण आले पाहिजे, असे म्हणतात, इतकी आस्था या क्षेत्राप्रती आहे. व्हॉट्स ॲप सोडून जेव्हा चांगले लिहिणारे तयार होतील, त्यावेळी महाराष्ट्रातून सर्वात जास्त संहिता लेखन होईल, असे मत सामंत यांनी व्यक्त केले. डॉ.दिपाताईंनी केलेला सत्कार वाया जाणार नाही, असेही ते म्हणाले.

### नगर येथे आज होणाऱ्या महाएल्गार मेळाव्याला

## भटके विमुक्त-ओबीसी समाज बांधवांनी उपस्थित राहावे - बापू गाडेकर

शेख आतिख/तलवाडा

गेवराई दि. महाराष्ट्रातील मुळ ओबीसी - भटके विमुक्त प्रवर्गातील समाजाचे आरक्षण वाचविण्यासाठी मा.ना.छगनरावजी भुजबळ यांच्यासह अनेक मान्यवर नेते मंडळींच्या प्रमुख उपस्थितीत आज शनिवार दि.०३ फेब्रुवारी रोजी दुपारी ठिक तीन वाजता क्लेरा ब्रुस मैदान, कोठी रोड, (अहिल्यादेवी नगर) अहमदनगर याठिकाणी महाएल्गार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून गेवराई तालुक्यातील सर्व बारा बलुतेदार व आठरा आलुतेदार या वर्गातील समाज बांधवांनी मोठया संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन बापू गाडेकर यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे केले आहे.



आज दुपारी ठिक तीन वाजता अहमदनगर (अहिल्यादेवी नगर) येथे ओबीसी - भटके विमुक्त समाजाचे आरक्षण वाचविण्यासाठी महाएल्गार मेळावा संपन्न होणार असून या मेळाव्याला ना.छगनरावजी भुजबळ, विरोधी पक्षनेते मा.विजय वडेट्टीवार साहेब, माजीमंत्री महादेव जानकर, माजी आमदार प्रकाश अण्णा शेंडगे, आ.गोपीचंद पडळकर, लक्ष्मण गायकवाड, माजीमंत्री राम शिंदे, राज्य मागासवर्ग आयोगाचे माजी सदस्य - लक्ष्मण हाके, मुस्लिम ओबीसी नेते शब्बीर अन्सारी, माजी आमदार नारायणराव मुंढे, प्रा.पी.टी.चव्हाण, प्रा.सत्संग मुंढे आदी मान्यवर नेते उपस्थित राहणार आहेत. या महाएल्गार मेळाव्याला गेवराई तालुक्यातील ओबीसी - भटके विमुक्त समाज बांधवांनी मोठया संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन ओबीसी कार्यकर्ते बापू गाडेकर यांच्यासह ओबीसी समाजाचे नेते - सुघोष मुंढे सर, जे.डी.शहा, परमेश्वर महाराज वाघमोडे, अंबादास बाबा पिसाळ, फुलचंद काका बोरकर, गजानन काळे, संतोष शेजूळ, दादासाहेब चौधरी, राजेंद्र विटकर, जयदीप गोल्हार आदींनी केले आहे.



**बीड: राजीव गांधी पंचायती राज संघटन (राष्ट्रीय काँग्रेस) बीड जिल्हा अध्यक्ष पदी लक्ष्मण दादा पवळ यांची निवड करण्यात आली यावेळी त्यांचा सत्कार करून शुभेच्छा देताना पदाधिकारी.**

**पान १ वरून...**

**चार आरोपींची ...**

दिले, अशा प्रकारची फिर्याद तेजस्वीनी आंबे हिने शिवाजी नगर पोलीस स्टेशन बीड येथे दिली होती. त्यानूसार पोलीसांनी आरोपीचे विरुध्द कलम ४९८-अ, ४९४,३२३ भा.दं.वि. प्रमाणे फिर्याद दाखल केली. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस अधिकारी यांनी करुन आरोपी विरुध्द दोषारोपपत्र मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात दाखल केले. सदर केसची सुनावणी पुर्वी मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी देशपांडे साहेब यांचे समोर होऊन बाकी सुनावणी मा. चौथे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी साहेब, बीड यांचे समोर झाली, या केस मध्ये सरकार पक्षातर्फे एकुण तीन साक्षीदार तपासण्यात आले असुन सदर प्रकरणात साक्षीदाराच्या जवाबामध्ये विसंगती आढळुन आल्याने मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेबांनी उभय पक्षाचा युक्तीवाद ऐकल्यानंतर आरोपी १)संतोष आंबे, २) बाळासाहेब आंबे, ३) बेबीताई आंबे ४) मनिषा सोमवसे यांची कलम ४९८-अ, ४९४,३२३ भा.दं. वि. कलमा म नुसार निर्दोष मुक्तता करण्यात आली.या प्रकरणात आरोपीतर्फे ॲड. ओमप्रकाश गायकवाड यांनी भक्कम बाजु मांडली त्यांना ॲड.एस.एस. सोनवणे व ॲड. आर. के. वडमारे यांनी सहकार्य केले.

**आता मनोज जरांगेंना ..**

मनोज जरांगे यांना आता कायमस्वरूपी दोन पोलीस कॉन्स्टेबलची सुरक्षा पुरवली जाणार आहे. गोदी पोलिस स्टेशनच्या दोन कॉन्स्टेबलची नियुक्ती ही केल्या जाणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.राज्य गुप्त वार्ता विभागाच्या आदेशाने जरांगे यांच्या सुरक्षेसाठी २४ तास दोन सशस्त्र पोलिसांचा बंदोबस्त असणार आहे. सकल मराठा समाजाकडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे मनोज जरांगे यांना सुरक्षा पुरवण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार आजपासून दोन कॉन्स्टेबल सुरक्षेसाठी नेमण्यात आली होती.

**हमीभावही मिळत ...**

सोयाबीनची विक्री करण्याची वेळ ओढावली. सोयाबीनचा किमान भाव चार हजार ३९० रुपये, तर कमाल भाव चार हजार ४५१ रुपये, तक सरासरी दर चार हजार ४३४ रुपये मिळाला असल्याची माहिती बाजार समितीच्या वतीने देण्यात आली.

एकीकडे भाव कमी असताना ते खरेदी केंद्रावर नेण्यासाठी वाहतूक खर्च एक हजार रुपये, दहा रुपये प्रत्येक पोत्याला हमाली घेतली जात आहे. त्यामुळे हातात काहीच पडत नसल्याचे पिंपळगाव येथील शेतकरी तुकाराम सीताराम घोळवे यांनी सांगितले. एडीएम कंपनीने भाव कमी झाल्याने बीड जिल्ह्यातील सर्व खरेदी केंद्रे बंद केली आहेत. त्यामुळे आडत दुकानदारांनी बाजार भाव आणखी कमी केला आहे. त्याचा फटका शेतकऱ्यांना बसत असून, शेतकऱ्यांच्या पदरात फक्त चार हजार ३०० रुपये पडत आहेत. यामुळे सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांची लूट होत असल्याचे शेतकरी महादेव निर्मळ यांनी सांगितले.

**बीड औद्योगिक...**

जिल्हयात विट भट्टीचे काम मोठया प्रमाणात होत असल्याचे पालकमंत्री श्री मुंडे यांनी निदर्शनात आणु दिले हा या रोजगारावर अनेक कुटूंब चालीत आहेत. त्यामुळे विट भट्टी क्लस्टर असल्यास या व्यवसायातील लोकांना याचा लाभ होईल असे श्री मुंडे यांनी माहिती दिली. यावर विट भट्टी क्लस्टर (उद्योग समुह) ला ताबडतोब तत्वत: मान्यता दिली.

जिल्हयातील शेतकरी रेशीम उद्योगाकडे वळत आहेत. काही शेतकरी शेतीसह जोड व्यवसाय म्हणुन रेशीम उद्योग करतात तर काही लोक पुर्ण वेळी रेशीम उद्योग करतात याचे रूपांतर देखील क्लस्टर करता येऊ शकते असल्याची माहिती पालक मंत्री यांनी दिल्यावर रेशीम उद्योगाचेही क्लस्टर करण्याची मध्ये करण्याच्या तत्वत: मान्यता देण्यात आल्याचे उद्योग मंत्री यांनी पत्रकार परिषदेत दिली.

**बीड जिल्हा रुग्णालयाच्या...**

मुदतीत सर्व माहिती पुरवल्यामुळे राज्य शासनाने बीड जिल्हा रुग्णालयातील पीसीपीएनडीटी विभागातील कायदा समुपदेशक ड निलेश जोशी यांची महाराष्ट्र राज्यातून गुणांकनात प्रथम क्रमांकाने निवड केली आहे. या मुळे बीडचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.अशोक रावसाहेब बडे व अधिकारी, कर्मचारी यांनी त्यांचा सत्कार केला.

विहित मुदतीत सर्व माहिती पुरवल्याने त्यांच्या या उत्कृष्ट कामकाजामुळे बीड जिल्हा रुग्णलयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवल्या गेला.तसेच ४ जानेवारी २०२४ रोजी गेवराई येथील स्टींग ऑपरेशनमध्ये गर्भवती महिलेची बहिन म्हणून जिल्हा रुग्णालयातील कनिष्ठ लिपिक श्रीमती सुनिता शिंदे यांनी सहभाग नोंदवल्या त्यांचेही राज्यसतरावर गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदानतंत्र या बैठकीस उपस्थित सर्व अधिका-यांनी अभिनंदन केले.

**शिवसैनिकांनो, एकजूट...**

शिवसैनिकांना पक्षवाढीसाठी आणि संघटन मजबुतीकरनासाठी महत्वपूर्ण मार्गदर्शन केले. उदयजी सामंत, विजय पाटील, यांच्या उपस्थितीमध्ये संपन्न झालेल्या बैठकीत महत्वपूर्ण मुद्यांवर चर्चासत्र तथा मार्गदर्शन करण्यात आले. या महत्वपूर्ण बैठकीसाठी बीड जिल्हा शिवसेना, युवासेना, महिला आघाडी तसेच अंगीकृत संघटनांचे पदाधिकारी, आजी-माजी लोकप्रतिनिधी यांनी उपस्थित रहावे असे आवाहन बीड शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन मुळुक आणि कुंडलिक खांडे यांनी केले होते त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत जिल्हाभरातून मोठ्या संख्येने पदाधिकारी उपस्थित राहिले होते.

**बीडमधील नाट्य..**

नाचत फुगडी खेळत आनंद घेतला. या नाट्य दिंडीत नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले, उपाध्यक्ष भाऊसाहेब भोईर, संमेलनाच्या कार्याध्यक्ष तथा बीड शाखाध्यक्ष डॉ.दीपाताई क्षीरसागर, स्वागताध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्यासह ज्येष्ठ नेते विजय गोखले, जेष्ठ अभिनेत्या सविता मालपेकर, संदीप पाठक, अंशुमन विचारे, सुधीर निकम, डॉ. विद्यासागर पाटगणकर, डॉ. डी.एस. कुलकर्णी, डॉ.संजय पाटील देवळाणकर, प्रा.मिलिंद शिवणीकर यांच्यासह असंख्य नाट्य कलावंत, विद्यार्थी या दिंडीत झाले होते.

# प्लास्टिक,स्टिलच्या जमान्यात ग्रामीण भागातील तांबटकरी कारागिर होतोय नामशेष

## ग्रामीण भागात पितळी जर्मन घागरी,हांडे,पातेलं दुरुस्त करा हो,कानी येणारा आवाज होतोय कालबाह्य

ज्योतीराम पांढरपोटे/माजलगाव

पुर्वीच्या काळी तांबटकरी कारागिराचे हातावरचेपोट असल्याने हलक्या आवाजात घागरी, हांडे,पातेलं दुरुस्त करा हो... असे म्हणत तांबटकरी ग्रामीण भागात दारोदारी फिरताना दिसत होता.परंतु काळाच्या ओघात प्लास्टिक घागरी,बकेट व स्टिलचे साहित्य आल्याने तांबटकरी कारागिरीवर उपासमारीची वेळ आल्याने तांबटकरी कारागिरांनी पारंपारीक तांबटकरी व्यावसाय सोडून आता मिळेल त्या कामावर आपला उदरनिर्वाह भागवताना दिसत आहे.

पूर्वी प्रत्येक गावच्या वेशी बाहेर किंवा रस्त्याच्या कडेला तांबटकरी तांब्याच्या घागरी, जर्मनीचे पातेले,लोखंडी बकेट दुरुस्त करून देण्याचा व्यवसाय करायचे.अलीकडे या व्यवसायाचे प्रमाण कमी झाले असले तरी अजूनही काही ठिकाणी हे परंपरागत व्यवसाय सुरु आहेत. माजलगाव तालुक्यातील ग्रामीण भागात फिरणाऱ्या व तांबटकरी व्यवसाय करणाऱ्यां ८० वर्षिय वयोवृद्ध व्याक्तीने नाव न छापण्याच्या अटीवर बोलतं केले, तेव्हा या ८० वर्षीय वयोवृद्ध तांबटकरी कारागिरांनी बोलताना सांगितले की,आपल्या वयाच्या दहा वर्षापासून हा पारंपारिक व्यवसाय करत आहेत. लग्नानंतर त्यांना ५ मुली झाल्या,याच व्यवसायावर कुटूंब चालवत सर्व मुलींची लग्न त्यांनी केली. मोठ्या मुलीचा आधार असतो, परंतु आपलं पोट भागविण्यासाठी आपणच होईल तोपर्यंत कष्ट केले पाहिजेत म्हणून ते या उतार वयातही घागरी ठोकुन दुरुस्तीचे काम करतात.या युगात कमी वेळेत,कमी कष्टात काम कसे होईल याकडे अनेकांचा ओढा असतो.परंतु आमच्या कष्टाकडे पाहिल्यास माझी या वयातही कामावरची निष्ठा समाजापुढे आदर्शच म्हणावी लागेल.

एका गल्लीत फिरले तर एखादे काम मिळते.प्लास्टिक व स्टिलमुळे आता तांबे पितळ, जर्मनची भांडे वापरात दुर्मिळ झाली आहेत. त्यामुळे आमच्या व्यवसायावर परिणाम झाला आहे. एखाद्याकडेच असे जुने भांडे असतील तरच हे काम मिळते. त्यामुळे,दिवसभरात कधी १०० तर कधी ३०० रुपये मजुरी मिळते.काम करताना काही तुटले,फुटले किंवा जोड व्वस्थित न बसल्यास ग्राहकांचे बोलणेही खावे लागतात.५० रुपयेमजुरी मागितली तरी त्यात घासागिस करणारे ग्राहक असतात. परंतु त्याला कष्ट किती लागतात याचे मोल कोणीच करत नाहीत. अशी व्यथाही वयोवृद्ध तांबटकरी कारागिर यांनी सांगितली. काहींना दया येते परंतु त्याचे प्रमाण अत्यल्प आहे.पैसे देऊन एकवेळचे जेवण व चहापाणी करणारेही आहेत. अशा काही जणांमुळेच या जगात माणुसकी शिल्लक आहे. या माणुसकीच्या बळावरच आपण या वयातही हे काम करतो असेही त्यांनी सांगितले.

### डोक्यावर ओझे

तांबटकरी, शिकलकरी कुठे तरी पाल ठोकून,त्या ठिकाणी आपला व्यवसाय करतात. परंतु,मी,मात्र मुक्कामा पुरतेपाल ठोकुन दारोदारी जावून आपला व्यवसाय करतोय साठी व सत्तरी सरली आता ८० च्या वयातही डोक्यावर साहित्याचे ओझे घेऊन मि दारोदारी फिरतोय. हे साहित्य कुठले तर त्यात दुरुस्तीसाठी लागणारी पक्कड, कात्री,पहार (टामी), जोड व झाळ देण्यास लागणारे पत्रे, कथील (धातू), भाता असे २० किलो वजनाचे साहित्य माझ्या डोक्यावर असते.



### भात्यावरचा हात थांबेल का

ऊन,पावसाची तमा न बाळगता मी या वयातही भाता घेऊन दारोदार फिरतात. जिथे काम मिळेल तिथे आपल्या डोक्यावरचा भाता खाली टेकवायचा अन् काम सुरू करायचे.माझा या भात्यावरचा हात कधी थांबेल याची चिंता ना शासनाला ना या व्यवस्थेला. शासनाच्या अनेक योजना आहेत,परंतु माझ्यासारख्या पर्यंत का पोचू शकत नाहीत. याचा अर्थ योजनांची अंमलबजावणी योग्य पध्दतीने होत नाही असाच घ्यायचा का असे प्रश्न निर्माण होतात.

# सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराचे उद्घाटन संपन्न

माजलगाव ।प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने युवकांचा नारा, स्वच्छ व समृद्ध भारत सारा हे ब्रीद घेऊन सात दिवसीय विशेष निवासी शिबिराचा उद्घाटन समारंभ दि. ०१फेब्रुवारी रोजी करण्यात आले.

शिबिराचे उद्घाटन प्राचार्य डॉ. जी.के.सानप यांच्या हस्ते झाले.कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच रामेश्वर चाळक होते. यावेळी प्रा. अशोक खेत्री,श्रीमती शिवकन्या लांबूड ( उपसरपंच), सिद्धेश्वर आर्डे, अच्युत कदम, श्रीमती आत्राम , श्रीमती आव्हाड , तलाठी एस. जी. ओवे, अमोल माने, गोपीनाथ पवार,प्रा. बालाजी बोडके, डॉ.अरुण पेंटावर, प्रा.सुदर्शन स्वामी,प्रा सतीश डाके, प्रा कृष्णा लंगडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी उदघाटनपर भाषणात बोलताना प्राचार्य डॉ जी. के.सानप म्हणाले की राष्ट्रउभारणीमध्ये युवकांची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. युवकांनी शिक्षणाबरोबरच सामाजिक विषयांवर व्यक्त झालं पाहिजे. पर्यावरण संरक्षण, बालविवाह, आपत्ती व्यवस्थापन, अंधश्रद्धा निर्मूलन यासारख्या अनेक सामाजिक प्रश्नांची उकल करण्याची क्षमता युवकांमध्ये आहे. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा. अशोक खेत्री यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना स्वतःच्या व्यक्तिमत्व विकासाची संधी निर्माण होते. विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन



निर्माण होऊन राष्ट्रीय चारित्र्य घडविण्यास होण्यास मदत होते असे मत व्यक्त केले. यावेळी गावचे सरपंच श्री. रामेश्वर चाळक यांनी आपल्या अध्यक्षीय समारोपात राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिराच्या माध्यमातून गावात नक्कीच सकारात्मक बदल घडेल असा आशावाद व्यक्त व्यक्त करून सहकार्याची भावना व्यक्त केली. याप्रसंगी राम कटारे यांनी त्यांच्या महाविद्यालयीन जीवनातील राष्ट्रीय सेवा योजनेतील अनुभव कथन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. नितीन ढवळे यांनी केले. सूत्रसंचालन स्वयंसेविका स्वाती चव्हाण हिने केले तर कार्यक्रमाचे आभार रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. उमेश राठोड यांनी मानले. याप्रसंगी कार्यक्रमाधिकारी डॉ. बिलास काळे, प्रा. ओ. एच. सारगे यांच्यासह रासेयो स्वयंसेवक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आ.सुरेश धस यांच्या वाढदिवसानिमित्त सरपंच परिवंत गायकवाड यांच्या कडून विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

आष्टी ।प्रतिनिधी

भाजपा नेते बीड लातूर उस्मानाबाद विधानपरिषदेचे सदस्य आ.सुरेश धस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत अनर्थ खर्च टाळून कऱ्हेवडगांवचे सरपंच परिवंत गायकवाड यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे व खाऊचे वाटप केले. आष्टी पाटोदा शिरूर मतदारसंघाचे भाग्यविधाते विकासाभिमुख नेतृत्व गोरगरीबांचे कैवारी विधानपरिषद सदस्य आ.सुरेश आण्णा धस यांचा वाढदिवस दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. वाढदिवसानिमित्त हार तुरे शाल फेटे यास होणारा अनर्थ खर्च न करता सामाजिक उपक्रम राबवावेत, तसेच गरजुंना मदत करण्याचे आवाहन आ.धस यांनी कार्यकर्त्यांना केले होते.त्यास प्रतिसाद देत कऱ्हेवडगांवचे विद्यमान सरपंच परिवंत गायकवाड यांनी युवा नेते जयदत्त धस यांच्या हस्ते जि.प.प्रा.शाळा कऱ्हेवडगाव,जि.प.प्रा.शाळा नागरगोजे वस्ती येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊ वाटप केले. यावेळी सरपंच परिवंत गायकवाड,मुख्याध्यापक बापु जायभाय, शिक्षिका रंजना सांगळे,शिक्षक सरोदे,भगवान सांगळे,शरद भगत, महेश हंबर्डे,मा.सरपंच केशव बांगर,मा.सरपंच जालिंदर नागरगोजे, युवा नेते जयदीप गायकवाड,बाळासाहेब नागरगोजे,शरद खांडवे,आत्माराम नागरगोजे, भगवान बांगर, कांतीलाल सांगळे, गहिनीनाथ नागरगोजे, प्रशांत नागरगोजे, हरीदास टकले, संजय गायकवाड,राम नागरगोजे,लक्ष्मण बांगर,राजू बोराडे, महेश सोले,अंकुश नागरगोजे, रोहिदास नागरगोजे, रोहिदास सांगळे,संजय गायकवाड, दादासाहेब नागरगोजे, जालिंदर खांडवे, हनुमान गायकवाड,शरद खांडवे, उध्दव खांडवे,अमर शेख,मोतीराम विधाते, उमेश बांगर, डॉ.किशोर बांगर, दत्ता जाधव,किरण गायकवाड, आदी उपस्थित होते.







# माजलगाव सरपंच संघटनेच्या तालुकाध्यक्षपदी भागवत शेजुळ व कोषाध्यक्षपदी बिसमिल्ला खान

माजलगाव ।प्रतिनिधी

राजकीय दृष्ट्या प्रतिष्ठित मानल्या जाणाऱ्या सरपंच संघटनेच्या माजलगाव तालुकाध्यक्षपदी आबेगावचे सरपंच भागवतराव शेजुळ तर कोषाध्यक्षपदी सोमठाण्याचे बिस्मिल्ला खान पठाण यांची बहुमताने निवड करण्यात आली. तसेच संघटनेच्या सचिवपदी किट्टी आडगावचे सरपंच रुखमानंद खेत्री यांची ही निवड करण्यात आली.९१ ग्रामपंचायत सरपंच-उपसरपंच पैकी यावेळी ८५ गावाचे सन्माननीय सरपंच उपस्थित होते.यावेळी माजलगाव येथे झालेल्या कार्यक्रमाला पंचायत समितीचे सभापती जयदत्त नडवडे, बाजार समितीचे संचालक नितीन नाईकनवरे, पात्रूड चे सरपंच लतीफ मोमीन, लुखेगावचे सरपंच ड.नासेर खान,सरपंच महेश चाळक इत्यादी सह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. या निवडीचे तालुक्यातून सर्वत्र स्वागत व अभिनंदन होत आहे.

# सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालय देगलूर येथे सायकल वाटप



## मानव विकास योजनेअंतर्गत मुलींना एकूण ४० सायकल वाटप

देगलूर ।प्रतिनिधी

शहरातील सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालय देगलूर मानव विकास मिशन योजनेअंतर्गत इयत्ता आठवी वर्गात शिकत असलेल्या ४० मुलींना मोफत सायकल वाटप करण्यात आले. या शाळेत शहरातील वेगवेगळ्या भागांतून मुली शिक्षण घेत आहेत. मुलींच्या प्रगतीसाठी तसेच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सावित्रीबाई फुले शाळा ही नेहमी धडपडत असते , म्हणून आजूबाजूच्या परिसरातील पालक आपल्या मुलींना या शाळेत शिकवण्यासाठी उत्साहित असतात. शाळेतील इयत्ता आठवीत शिकणाऱ्या एकूण ४० मुलींना सायकलींचे वाटप करण्यात आले.यावेळी मुलींच्या चेहऱ्यावर सायकल मिळाल्याचा आनंद ओसंडून वाहत होता. मुलींना शाळेला ये-जा करण्यासाठी अडचण होत असे , या सायकलीमुळे आपले शिक्षण पूर्ण करण्यासाठी एक चांगली भेट शासनाकडून मिळाली असल्याची भावना मुलीमधून व पालकांनी व्यक्त केली.मुलीच्या शिक्षणासाठी शासन तसेच आम्ही लोकप्रतिनिधी म्हणून सदैव तुमच्या सोबत आहोत असे मत आमदार जितेश अंतापूरकर यांनी व्यक्त केले.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लोकहीत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रा. न. कहाळेकर सर,प्रमुख पाहुणे देगलूर बिलोली मतदार संघांचे आमदार जितेश अंतापूरकर, माजी नगराध्यक्ष मोगलाजी शिरशेटवार, लोकहीत शिक्षण संस्थेचे सचिव अँड जयवंतराव गजभारे, शिक्षण विस्तार अधिकारी झम्पलवाड सर, मानव विकास प्रमुख पांचरे सर, युवक कॉंग्रेस देगलूर बिलोली अध्यक्ष जनार्धन बिरादार, माजी नगरसेवक अजय वानखडे, देवानंद कंधारकर (सदस्य,लोकहित शिक्षण संस्था) आदी यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक वाय.आर.गजभारे प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक के.सी.पाटील तसेच शाळेतील शिक्षक बंधू भगिनी संबंधित विद्यार्थी व पालक उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विशाल पवार यांनी केले तर प्रस्ताविक के. सी.पाटील तसेच आभार विनोद पाटील यांनी मांडले.

# ज्येष्ठ पत्रकार चौधरी यांचे निधन

किनवट ।प्रतिनिधी

किनवट येथील ज्येष्ठ पत्रकार व सेवा निवृत्त शिक्षक म. आ. चौधरी (वय ७४ वर्षे) यांचे गुरूवारी दि.०१ दुपारी १२.३० वाजता त्यांच्या राहत्या घरी वृद्धापकाळाने निधन झाले. शहरातील कॉस्मापॉलिटन शाळेमध्ये ते गणिताचे विद्यार्थीप्रिय शिक्षक होते. कुठलीही संपर्क सुविधा नसल्याच्या काळात कधी हस्तलिखित तर कधी दूरध्वनी अथवा तारेद्वारे त्यांनी तत्कालीन अनेक महत्वपूर्ण घटनांचे वस्तुनिष्ठ वार्तांकन करून वाचकप्रियता मिळविली होती.दै सत्यप्रभाव दै सामना यावृत्त पत्रात वार्तांकन केले , नांदेड येथील दै.प्रजावाणी व दै.गोदातीर समाचार मध्ये त्यांनी ज्येष्ठ वार्ताहर म्हणून दीर्घकाळ सेवा केली. समय सूचकते सोबतच वाचणाचा छंद ते जोपासात होते अनेक नाटक, कादंबऱ्यातील पाठ ते लिलया सहज बोलून दाखवत प्रगाढ वाचन, नर्मविनोद बुद्धी व हजर जबाबीपणामुळे ते अल्पावधीतच समोरच्याला आपलेसे करीत. चिकित्सक, अभ्यासू व्यक्तीमत्व असल्यामुळे समाजातील विसंगती,



भ्रष्टाचार, दुर्बलावरील अन्याय, अत्याचाराच्या विरोधात ते सदोदित निर्भिडपणे मर्मभेदी लिखाण करून पिडितांना न्याय देण्याचा प्रयत्न करीत.

आज गुरूवारी सायंकाळी सात वाजता पैनगंगा तिरावरील कैलास मोक्षधाम येथे त्यांच्या पार्थिवावर अंतिम संस्कार करण्यात आले. यावेळी शहरातील अनेक प्रतिष्ठित नागरिक, पत्रकार उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगी, जावई व नात असा परिवार आहे. दै.प्रजावाणी व दै.गोदातीर समाचार चे पत्रकार आशिष देशपांडे यांचे ते सासरे होत.

# डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा डावलून ध्वजारोहण

## संस्था चालक रामराव माने वर गुन्हा

माजलगाव ।प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील राजेगाव येथील गुरुनानक पब्लिक स्कूल मध्ये २६ जानेवारी २०२४ रोजी प्रजासत्ताकदिनाचे ध्वजारोहणा प्रसंगी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा डावलल्या कारणाने शाळेचे संस्था चालक रामराव यशवंत माने विरोधात माजलगाव ग्रामिण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणी राहूल ज्ञानोबा साळवे रा.राजेगाव,ता.माजलगाव या पालकाने माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादी नुसार ते त्यांच्या दोन पाल्यांना घेऊन ध्वजारोहण कार्यक्रमासाठी शाळेत गेले होते. ध्वजा रोहणा अगोदर कर्मचारी ज्ञानेश्वर सकपाळ यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा ध्वज स्तंभा जवळ ठेवली होती मात्र रामराव माने याने ती प्रतिमा ऑफिस मध्ये ठेवून द्या असे सांगितले की,ऑफिस मध्ये ठेवून द्या. हे बोलणे तिथे उपस्थित असलेले ग्रामस्थांनी ऐकले असता रामराव ला विचारणा केली की बाबासाहेबांची प्रतिमा का काढत आहात. तेंव्हा त्यांनी ग्रामस्थांना अरेरावी भाषेत म्हणाले की, शंभराहून जास्त महापुरुष आहेत मग सगळ्यांचे फोटो लावलायचे का? असा प्रति प्रश्न केला यामुळे राजेगाव येथील ग्रामस्थांच्या भावना दुखावल्या. अश्या फिर्यादी वरुन संस्थाचालक रामराव यशवंत माने रा.पौळ पिंपरी ता.परळी,जि.बीड याच्या विरोधात भादंवी.कलम २९५ त्यांच्यावर गुन्हा नोंद करण्यात आला.

# स्व. मेटे साहेबांचे विचार सामान्यांपर्यंत पोहचवणार :- नवनाथराव इसरवाडे

## जयशिवसंग्राम पक्षाच्या जिल्हाध्यक्षपदी नवनाथराव ईसरवाडे यांची नियुक्ती....!

शेवगाव/प्रतिनिधी

स्वर्गीय विनायकराव मेटे साहेब यांनी शिवसंग्राम पक्षाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील गोरगरीब जनतेच्या सदैव पाठीशी उभा राहून सर्वसामान्य कार्यकर्त्यांना बळ देऊन नेहमीच तळागाळातील कार्यकर्त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करून सदैव सामान्यांसाठी आवाज उठविला, शेतकऱ्यांचे, गोरगरिबांचे अनेक प्रश्न मार्गी लावले. मराठा आरक्षण या शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नावर सातत्याने नेहमी आवाज उठवून अनेक प्रश्न मार्गी लावले आहे. याच पार्श्वभूमीवर जयशिवसंग्राम या संघटनेच्या माध्यमातून अहमदनगर जिल्ह्यात काम करून स्व. मेटे साहेबांचे विचार सामान्यांपर्यंत पोहचवणार असल्याचे प्रतिपादन जयशिवसंग्राम पक्षाचे नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष नवनाथराव ईसरवाडे यांनी केले.स्वर्गीय विनायकराव मेटे साहेब यांच्या आशीर्वादाने जयशिवसंग्राम पक्षाचे संस्थापक, अध्यक्ष रामहरी भैया मेटे तसेच जयशिवसंग्राम पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुरेशराव शेटे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत अहमदनगर येथील शासकीय विश्रामगृह येथे गुरुवार दि. १ रोजी जयशिवसंग्राम पक्षाच्या प्रमुख



पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली असून या बैठकीत अहमदनगर जिल्ह्याची कार्यकारीणी जाहीर करण्यात आली आहे. यावेळी आयोजित बैठकीत जयशिवसंग्राम पक्षाचे नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष नवनाथराव ईसरवाडे हे बोलत होते.अहमदनगर जिल्ह्याची कार्यकारीणी पुढील प्रमाणे :- अहमदनगर जिल्हाध्यक्षपदी नवनाथराव ईसरवाडे, जिल्हा उपाध्यक्षपदी चंद्रभान फटांगडे, शेवगाव तालुका अध्यक्षपदी संदीपराव बामदळे, शेवगाव शहराध्यक्षपदी अशोकराव कुसळकर, युवक तालुका अध्यक्षपदी विकास गटकळ यांच्यासह आदी पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली असून यावेळी बाबासाहेब गरड, कानिफनाथ धुमाळ, वरून शेटे, निखिल जाधव, सुमित गोरे, ऋषी बर्डे, दादा मस्के यांच्या सह जिल्ह्यातील जयशिवसंग्राम पक्षाचे कार्यकर्ते, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मोठे स्वप्न बघा त्यातील ताकद आणि धमक ओळखा - डॉ.नीता गायकवाड यांचे प्रतिपादन

# पी.एच.डी पदवी प्राप्त झाल्याबद्दल- डॉ.नीता गायकवाड यांचा तुलसी शैक्षणिक समुहाच्या वतीने भव्य सत्कार

**बीड ।प्रतिनिधी**

**विद्यार्थ्यांनी मोठे स्वप्न बघावे, त्यातील ताकद आणि धमक ओळखावी असे प्रतिपादन सत्कारमुर्ती डॉ.नीता गायकवाड यांनी केले. मानव विकास व कौटुंबिक अभ्यास या विषयांमध्ये पी.एच.डी पदवी प्राप्त झाल्याबद्दल तुलसी शैक्षणिक समुह बीड यांच्या वतीने शुक्रवार दि.०२ फेब्रुवारी २०२४ वेळ दुपारी.०२.०० वाजता तुलसी कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड आय.टी, बीड येथे त्यांचा भव्य सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी देवगिरी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा.प्रदिप रोडे, तुलसी महिला मंडळाच्या अध्यक्षा दिपाताई रोडे,तुलसी कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड आय.टी,बीडचे प्राचार्य डॉ. लंकेश्वर थोरात, तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन बीडच्या प्राचार्य अश्विनी बेद्रे, तुलसी इंग्लिश स्कुल बीडच्या प्राचार्य उमा जगतकर यांची उपस्थिती होती.**

डॉ.नीता गायकवाड या सहयोगी प्राध्यापक आणि वरिष्ठ शास्त्रज्ञ अ.भा.स.सं.प्र. कृषीरथ महिला, भारतीय कृषी अनुसंधान, नवी दिल्ली सामुदायीक विज्ञान महाविद्यालय वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथे कार्यरत आहेत. सत्कार प्रसंगी पुढे बोलताना डॉ.नीता गायकवाड म्हणाल्या की, आई वडील वाघासारखे असल्यास झेप घेणे सोपे आहे असे भावोउद्गार त्यांनी काढले. तुलसी शैक्षणिक समूहाने केलेला हा सत्कार माझ्यासाठी घरचा आहेर आहे




असे सांगत त्या यावेळी भावनिक झाल्या त्यांचा डोळ्यात अश्रू आले, हे अश्रू कमजोर पणाचे नसल्याचे त्यांनी सांगितले. माझे आजोबा संताराम गोदाम (गुरुजी) बीड जिल्हा परिषदे मध्ये शिक्षणाधिकारी होते असे म्हणत त्यांचा अनेक आठवणींना उजाळा दिला. गोदाम गुरुजी आमच्या घरातील पहिले ग्रज्युएट असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनीही आपल्या शैक्षणिक जीवनामध्ये मोठी स्वप्न पाहून ती स्वप्न पूर्ण करण्याची तयारी ठेवली पाहिजे असे त्यांनी आवर्जून सांगितले तसेच किशोरवयीन मुलांवर होणारे बदल या विषयावर विस्तृतपणे मार्गदर्शन केले. प्रा.प्रदीप रोडे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये कायझन थेरी सांगत ध्येय गाठण्यासाठी परिश्रम महत्त्वाचे असल्याचे सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य अश्विनी बेद्रे यांनी केले तर सूत्रसंचालन तझीन तुबा यांनी केले. याप्रसंगी तुलसी शैक्षणिक समुहातील सर्व प्राध्यापक कर्मचारी विद्यार्थी विद्यार्थिनी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



बीड जिल्ह्यात लाडली बेटिया या हिंदी चित्रपटाचे मोठ्या उत्साहात सुरवात आज बीड जिल्ह्यात मोठ्या उत्साहात नवकिरण फिल्म व बीड बोला पोलीस दलाचा हिंदी चित्रपट लाडली बेटीया सर्वांच्याच भेटीला येत आहे निर्माते -बी एस जोगदंड लिखित लाडली बेटीया आज सर्वच चित्रपट ग्राहक दाखवला जात आहे. बीड जिल्ह्यासह शहरात महिलां मुलींनी मोठ्या संख्येच्या चित्रपट हाउसफुल झाला. यावेळी बीड जिल्ह्याचे जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अशोक बडे, डॉ. हनुमंत पारखे, डॉ.लक्ष्मण तांदळे, या चित्रपटाचे प्रसिद्धीप्रमुख ज्ञानोबा वायबसे यांच्यासह बीड शहरातील प्रतिष्ठित महिला यांच्या उपस्थितीत हा लाडली बेटिया हा चित्रपट प्रदर्शित करण्यात आला.



विधान परिषदेचे आमदार सुरेशअण्णा धस यांच्या वाढदिवसानिमित्त पाटोदा नगरपंचायत च्या वतीने दिव्यांग विद्यार्थ्यांना दप्तर ,ड्रेस तसेच दिव्यांग बांधवांना कपडे व साहित्याचे वाटप करण्यात आले यावेळी भव्य रक्तदान शिबिर घेण्यात आले.या कार्यक्रमास युवा नेते जयदत्त धस व नगरपंचायत चे पदाधिकारी व दिव्यांगाची प्रमुख उपस्थिती होती (छाया:राहुल सोनवणे पाटोदा )

## अट्टल पाच दरोडेखोरांच्या चकलांबा पोलीसांनी आवळल्या मुसक्या

गेवराई । प्रतिनिधी

बऱ्याच दिवसांपासून बीड जिल्ह्यातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रभर वेगवेगळ्या विषयी सामाजिक प्रश्न ऐरावणीवर आला असून त्या अनुषंगाने मोठमोठे मोर्चे,आंदोलने, विराट सभा होत असून त्यामधून मोठ्या प्रमाणात जाती-जातीमध्ये द्वेष, तेढ निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्याचा आपण पाहत आहोत. सर्वसाधारणपणे गुन्ह्यास प्रतिबंध करणे, गुन्ह्याचा शोध लावणे व कायदा व सुव्यवस्थेचा राखणे हे पोलिसांचे मुख्य तीन कामे समजली जातात परंतू संधीचा फायदा घेऊन चकलांबा पोलिस ठाण्याअंतर्गत विविध गांवात जबरी चोरी ,दरोडा असे प्रकार घडत होते याच गुन्ह्यातील पाच अट्टल दरोडे खोरांना मोठ्या शिताफितीने चकलांबा पोलिसांनी मुसक्या आवळल्या असुन त्यांना ताब्यात घेतले आहे

याबाबद सविस्तर माहिती अशी की, सध्याच्या महाराष्ट्रातील सामाजिक व राजकीय परिस्थिती पाहता पोलिसांना आपले सर्व बळ, ताकत ही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न अबाधित राखणे कामी खर्च करावी लागत आहे. त्यातही पोलिसांचे संख्याबळ कमी पडत आहे. तीन महत्त्वाच्या कर्तव्यापैकी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न हाताळण्यासाठीच पोलिसांना जास्त वेळ द्यावा लागत असल्याकारणाने गुन्ह्यांचा प्रतिबंध व गुन्ह्यांचा शोध ही पोलिसांची कर्तव्य पार पाडण्यात पोलीस कमी पडत आहेत. ही गोष्ट खरी असली तरी काही कर्तव्यनिष्ठ ध्येयवेडे अधिकारी आपल्या कर्तव्याचे भान ठेवून संधी साधू लोकांचे मनसुबे उध्वस्त करण्यात रात्रीचा दिवस करून गुंतलेले असतात. सामाजिक व राजकीय परिस्थिती व त्यातून उद्धवणाऱ्या कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न हाताळण्यात पोलीस गुंतलेले असताना अट्टल दरोडेखोर,चोर या संधीचा गैरफायदा घेतात. याचाच गैरफायदा




संपूर्ण बीड जिल्ह्यात दरोडे, घरफोडी, चोरी करणाऱ्या गुन्हेगारांनी घेतला असून मोठ्या प्रमाणावर दरोडे घरपोडी चोरीचे सत्र मागील काही दिवसापासून आपण पाहत असून ते थांबता थांबत नसल्याचे दिसून येत आहे. त्यास चकलांबा पोलीस ठाणे ही अपवाद नाही. मागील काही दिवसात चकलांबा पोलीस स्टेशन हद्दीमध्ये तीन जबरी चोरीचे तसेच पाच रात्रीच्या घरफोड्या, एक दिवसाची घरपोडी झालेली आहे. परंतु चकलांबा पोलीस स्टेशन कडील अधिकारी कर्मचारी यांनी जिगर दाखवत तीनही जबरी चोऱ्या उघडकीस आणून आरोपी सह मुद्देमाल जप्त केला आहे. रात्रीच्या घरफोडीचे मोठे आव्हान चकलांबा पोलिसांसमोर होते. चकलांबा पोलीस घरफोडी करणाऱ्या चोरांच्या मागावर बऱ्याच दिवसापासून होते. प्रयत्नांती परमेश्वर या उक्तीप्रमाणे चकलांबा पोलिसांना मोठ्या सीताफिने रेकॉर्ड वरील अट्टल पाच दरोडेखोरांना पकडण्यात यश आले त्यांच्यावर दरोडा घरफोडी, जबरी चोरी, मोक्का यासारखे अनेक गंभीर गुन्हे विविध जिल्ह्यात व पोलीस स्टेशनला दाखलअसून त्यांना संबंधित गुन्ह्यात अटक केली असून लाखोंचा मुद्द्यमाल जप्त करण्यात आलेला आहे. हे चकलांबा पोलिसांचे मोठे यश मानले जात आहे. त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरण्यात आलेला चाकू, एक लोखंडी रॉड जप्त करण्यात आला आहे. तसेच त्यांच्याकडून जिल्ह्यातील बरेच गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच या पाच अट्टल दरोडेखोरांच्या मुसक्या चकलांबा पोलिसांनी आवळल्या आहे यामध्ये १) दीपक गौतम पवार २) गोविंद गौतम पवार ३) राजेश दिलीप भोसले सर्व राहणार टाकळी अंबड ता पैठण जि संभाजीनगर ४) नितीन मिश्रा चव्हाण रा जोड मालेगाव ता गेवराई जि बीड ५) किशोर दस्तगीर पवार रा पैठण जिल्हा संभाजीनगर असे असून सदर कारवाई ही मा पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकूर,अप्पर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर उप विभागिय पोलिस अधिकारी, नीरज राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली चकलांबा पोलिस ठाण्याचे सहाययक पोलिस निरीक्षक नारायण एकशिंगे, पोलिस उपनिरीक्षक अनंता तांगडे, पोलिस उपनिरीक्षक रामेश्वर इंगळे, सफो गाडे, पोह बारगजे, पोह केदार, पोह खेडकर, पो शि खेत्रे, पो शि घोंगडे यांनी केली.


## न्यायालयाचा मनाई हुकूम असतानाही मुस्लीम कब्रस्तानची तोडफोड

कोमटवार कुटुंबीयांची मनमानी ➤ कायदा व सुव्यवस्था धोक्यात!

धारूर ।प्रतिनिधी

मौजे धारुर येथील जमीन सर्वे नं. ६२२, ६२३/अ, ६२३/आ मा.उच्च न्यायालय औरंगाबाद (खंडपीठ) यांचे जैसे थे परिस्थिती ठेवण्याचे आदेश असतांना सुध्दा मुस्लीम समाजाच्या कब्रस्तान मधील कबरी तोडुन मुस्लीम समाजाच्या आस्थेला ठेच पोहचवुन धार्मिक भावना दुखावल्याने कब्रस्तानची तोडफोड करणाऱ्या कोमटवार कुटुंबीयांची मनमानी प्रशासनाने थांबवून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी कब्रस्तानची तोडफोड करणाऱ्या कोमटवार कुटुंबीयांवर कायदेशीर कार्यवाही करून गुन्हा दाखल करावा. अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सय्यद फिरोज कासम यांच्यासह मुस्लीम समाजाने पोलीस निरीक्षक धारूर यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

याविषयी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, मौजे धारुर ता. धारुर येथील मुस्लीम समाजातर्फे जमीन सर्वे नं. सर्वे नं.६२२, ६२३/अ, ६२३/आ जमीन बाबत मा. वक्फ ट्रिब्युनल न्यायालय औरंगाबाद दावा नं. ३/२०१७ चालु असुन प्रलंबीत आहे. उच्च न्यायालय येथे सी.आर.ए. क्रं. ५३/२०१९ चालु असुन न्यायालयाने दिनांक १४



मार्च २०१९ रोजी जैसे थे परिस्थिती ठेवण्याचे आदेश असतांना आदेश पारीत केले आहेत व ते आजपर्यंतही कायम आहेत. असे असतांना सुध्दा मौजे धारुर येथील नामे दिलीप हरीनाथ कोमटवार (तेलंग) व त्यांची मुले नामे १. अजय दिलीप कोमटवार, २. अमीत दिलीप कोमटवार, ३. अक्षय दिलीप कोमटवार, ह.मु. दिंद्रुड ता. माजलगाव यांच्या विरोधात दिंद्रुड पोलीस ठाणे येथे तीन प्रकारे वेगवेगळे गुन्हे दाखल आहेत. व मौजे धारुर येथील संजीत जगन्नाथ कोमटवार (देशी दारु दुकान मालक) व त्याचा मुलगा साईनाथ संजीत कोमटवार यांनी जाणुनबुजुन मुस्लीम समाजाचे कब्रस्तान मधील कबरी तोडुन उच्च न्यायालयाच्या आदेशाचे अवमान केले. मुस्लीम समाजाच्या आस्थेला ठेस पोहचवली व धार्मिक भावना दुखावल्या आहेत. यामुळे वरील संबंधीतांवर कायदेशीर कार्यवाही करुन गुन्हे दाखल करण्यात यावेत. अशी मागणी सय्यद फेरोज कासम यांच्यासह मुस्लीम समाजाने धारूर पोलीस निरीक्षकांशिवाय बीड जिल्हाधिकारी, बीड जिल्हा पोलीस अधीक्षक, राज्याचे मुख्यमंत्री, गृहमंत्री, संरक्षण मंत्री, वक्फ़मंत्री आदींना पाठविलेल्या निवेदनातून केली आहे.

रिपाईच्या तालुका अध्यक्ष दिनेश उघडे यांच्या मुलीचा वाढदिवस

## मतिमंद मुलांच्या समवेत मोठ्या उत्साहात साजरा

मुरबाड ।प्रतिनिधी

रिपाईचे मुरबाड तालुका अध्यक्ष दिनेश उघडे यांची कन्या पूर्वा हिचा वाढदिवस तारांगण मतिमंद मुलांच्या शाळेत मोठया उत्सहात रिपाई महाराट्र उपाध्यक्ष दानशूर व्यक्ती मत्व मेहबूब भाई पैटणकर यांच्या व नवनिर्वाचित मुरबाडचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोदजी बाबर साहेब यांच्या प्रमुख उपस्थित संपन्न झाला मुरबाड मधील तारांगण मतिमंद मुलांच्या शाळेतीत विध्यार्थी यांच्या समवेत केक कापून त्यांना फळे, खाऊ वाटप करून साजरा केला त्यावेळी कार्यकमाला खास करून उपस्थित राहिलेले महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष मेहबूब भाई पैटणकर,मुरबाडचे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक प्रमोदजी बाबर साहेब रिपाई तालुका अध्यक्ष दिनेशजी उघडे,ऍड शरदजी थोरात,एसटी महामंडळाचे प्रदोषजी हिंदुराव, महिला अध्यक्षा सुरेखाताई खोळंबे,तालुका सरचिटणीस भूपेश साटपे कार्याध्यक्ष संजय खोळंबे,जेष्ठ पत्रकार प्रकाश जाधव, जेष्ठ पत्रकार, जयदीप



आढाइंगे, मनसेचे नेते नरेशजी देसले,पशुसंवर्धनचे महेंद्र धनगर,पत्रकार ऍड किशोर गायकवाड लक्ष्मण पवार,,भगवान भालेराव,तुकाराम खोळंबे,सुनील फाळे,दत्तात्रय थोरात,विध्यार्थी परिषद जिल्हा अध्यक्ष संतोषजी उघडे,जेष्ठ पत्रकार संजय बोरगे,कांचन उघडे,पोलीस कर्मचारी उदमाळे साहेब,वसंत थोरात,रामशेठ शेळके,संदीप देसले,प्रकाश उघडे योगेश साटपे, भीमराव उघडे, आदीक भवार,अनिकेत भालेराव,रवी उघडे, संतोष गायकवाड,जितू अहिरे,मारुती जाधव, चंद्रकांत धुमाळ, मिलिंद थोरात कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऍड शरद थोरात यांनी केले, कार्यक्रमाची व्यवस्था म्हाडसे सरांनी केली,प्रमोदजी बाबरे साहेब यांनी मोलाचे प्रमुख मार्गदर्शन करून अनेक मान्यवरांनी वाढदिवसा निमित्त शुभेच्छा दिल्या,अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात पूर्वा हिचा वाढदिवस साजरा केला.

## सहाय्यक पोलीस अधीक्षक कमलेश मिना यांचा दणका !

लाखोंचा गांजा जप्त करून तीन महिला आणि दोन पुरुष ताब्यात

गौतम बचुटे/केज :- केज येथे सहाय्यक पोलीस अधीक्षक कमलेश मिना यांची धाडसी कारवाई करून गांजाची वाहतूक करीत असलेली स्कॉर्पिओ गाडी आडस जवळ पाठलाग करून अडवून ताब्यात घेतली. त्याची झडती घेतली असता गाडीत अवैद्य गांजाची तस्करी होत असल्याचे आढळून आले. या कारवाईत ११७ किलो ग्रॅम गांजासह तीन महिला आणि दोन पुरुष अशा पाच जणांना ताब्यात घेतले आहे.अंबाजोगाई येथून आडस मार्गे जाणाऱ्या स्कॉर्पिओ मध्ये गांजाची तस्करी होत असल्याची गुप्त माहिती सहाय्यक पोलीस अधीक्षक कमलेश मिना यांना मिळताच त्यांनी ही माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर आणि वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना दिली. वरिष्ठांच्या आदेशाने स्वतः सहाय्यक पोलीस अधीक्षक कमलेश मीना आणि धारूरचे सहाय्यक पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे,



पोलीस उपनिरीक्षक गोविंद बास्टे, प्रशांत मस्के, जमीर शेख, विकास चोपने, अशपाक इनामदार, नाना निंगुळे, नितिन काळे, परमेश्वर वखरे, धम्मानंद गायसमुद्रे, मुकेश खरटमोल, मल्लिकार्जून माने, श्रीमती दिक्षा चक्के, तुकाराम चांदणे यांनी संशयित स्कॉर्पिओ गाडीचा पाठलाग करून सदर संशयित स्कॉर्पिओ गाडी क्र (एम एच-२३/वाय-०७१४) ही गाडी पाठलाग करून सापळा लावून आडस जवळ गाडी अडविली. गाडी अडविल्या नंतर पोलीस पथकाने स्कॉर्पिओ गाडी त्यातील तीन महिला व दोन पुरुषांना ताब्यात घेऊन गाडीची झडती घेतली असता त्या गाडीत १ क्विंटल १७ किलो ग्रॅम वजन असलेले गांजाची पाकिटे आढळून आली. त्या नंतर पोलिसांनी ती गांजाची वाहतूक करणारी स्कॉर्पिओ गाडी आणि ताब्यात घेतल्या तीन महिला व दोन पुरुष यांना धारूर पोलीस ठाण्यात आणून त्यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.दरम्यान अशा अवैद्य धंद्यावर कारवाया करून सळो की पळो करून सोडणारे सिंघम आयपीएस पोलीस अधिकारी पंकज कुमावत यांच्या पदोन्नती नंतर त्यांच्या जागी रुजू झालेले सहाय्यक पोलीस अधीक्षक कमलेश मीना आणि त्यांच्या पथकाने या विभागात पहिलीच मोठी धडाकेबाज कारवाई केली असल्याने अनेकांचे धाबे दणाणले आहे.

## रेल्वे मंत्रालयातर्फे महाराष्ट्राला भरीव मदत

सन २०२४-२५ दरम्यान रेल्वे प्रकल्पासाठी तब्बल १५,५५४ कोटींची तरतूद

ज्येष्ठ पत्रकार/परभणी
संपर्क : ९८६०११७५९२

नांदेड : रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी १ फेब्रुवारी २०२४ संसदीय पटलावर सादर केलेला अंतरिम अर्थसंकल्पाच्या अनुषंगाने नांदेड येथील द.म.रे.च्या विभागीय कार्यालयात १ फेब्रुवारी २०२४ रोजी पत्रकार परिषद घेण्यात आली. नवी दिल्ली येथून महाराष्ट्र राज्यातील रेल्वे विभागाशी संबंधित वाटपाच्या ठळक बाबींवर विशेषत्वाने चर्चा करण्यात आली. ज्यामध्ये द.म.रे.चे महाव्यवस्थापक अरुणकुमार जैन, रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी निलयम यांनी सिकंदराबाद येथे भाग घेतला होता.यावेळी रेल्वेमंत्री ना.वैष्णव म्हणाले की, सन २०२४-२५ या वर्षासाठी २,५२,००० कोटी रुपये मंजूर करुन पंतप्रधान मोदी यांच्या 'सबका साथ, सबका विकास' या संकल्पनेवर लक्ष केंद्रीत केले आहे. ज्यामुळे रेल्वेची क्षमता वाढली जाईल. त्याचाच एक भाग म्हणून तीन मोठे आर्थिक रेल्वे कॉरिडॉर प्रकल्प राबवले जाऊन पुढील ६-८ वर्षात ४० हजार किलो मीटरचे ट्रॅक टाकले जातील. महाराष्ट्राशी संबंधित रेल्वे अर्थसंकल्पातील ठळक मुद्दे महाराष्ट्रातील रेल्वेसाठी सन २०२४-२५ वर्षीय कालावधीत एकूण अर्थसंकल्पीय तरतूद १५ हजार ५५४ कोटी एवढी असून ही राज्यासाठी असलेल्या अर्थसंकल्पीय तरतूदीपैकी सन २००९-१४ च्या तुलनेत १३००% वाढली असून असल्याचे रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले, तेव्हा बजेट फक्त १ हजार ११७ कोटी होते. वैष्णव यांनी सांगितले.. पुढे रेल्वेमंत्री असेही म्हणाले की, महाराष्ट्र राज्यातील रेल्वे विकासासाठी ८० हजार कोटींची गुंतवणूक आहे अमृत मारत स्टेशन योजनेचा एक भाग म्हणून राज्यभरातील १३०० रेल्वे स्थानके अद्ययावत करण्यात येत आहेत. पैकी १२६ रेल्वे स्थानकांचा अमृत स्थानक म्हणून पुनर्विकास करण्यात येत आहे. राज्यभरात रेल्वे मार्गाचे ९८ टक्के विद्युतीकरण पूर्ण झाले असल्याचेही मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले आहे. स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्यभरातील रेल्वे स्थानकांवर ११७ हून अधिक 'एक स्थानक' एक उत्पादन स्टॉल उभारण्यात आले आहेत असेही ते म्हणाले.

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे,

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra).
Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com,
epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com